G.R.( PARIPATRAK ) A4

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## ( लेखा व वित्त विभाग )

क्रमांकः 194 / प्रलेविअ / 2016 दिनांक : 17 / 6 / 2016

## परिपत्रक

शिक्षण विभाग आवक क्र. 4802 दिनांक 20-6-16 ...का, नागपूर

प्रति,

1) सर्व विभाग प्रमुख
महानगरपालिका, नागपूर
2) सहाय्यक आयुक्त ( सर्व झोन),
महानगरपालिका, नागपूर

MOST URGENT

**विषयः— मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधिल तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत**

महानगरपालिका नागपूर व्दारे आपल्या विभागाकडून देण्यात आलेल्या कार्यादेशाचे मुल्य विचारात घेवून आवश्यक मुद्रांक शुल्काचे दस्तऐवजावर करारनामा करण्याबाबतच्या सुचना या विभागाने परिपत्रक क्रमांक 59 / प्रलेविअ / 2011 दिनांक 26 / 5 / 2011 अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

परंतू करारनामा करतांना मुद्रांक शुल्क चुकविण्यात आल्याची / कमी आकारणी झाल्याने याचिका दाखल झाल्याची बाब शासन पत्र महसुल व वनविभाग क्र. याचिका 2016 / 1214 / प्र. क्र. 1323 / म.1 दिनांक 31 / 5 / 2016 अन्वये निदर्शनास आणून दिलेली असून शासन पत्राची प्रत या सोबत जोडली आहे.

तेव्हा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणारा करारनामा हा कार्यादेश मुल्यानुसार मुद्रांकशुल्क आकारणी केलेला असल्याची खात्री करावी.

सहपत्रः— वरील प्रमाणे

( म.म.गाडगे )
प्रमुख लेखा व वित्त अधिकारी,
महानगरपालिका, नागपूर.

प्रतिलीपी सादरः—

1) मा.डॉ. के एच गोविंद राज, सचिव, ( मदत व पूनर्वसन, ) महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई 400032 यांना माहिती करीता सविनय सादर
2) मा. आयुक्त, मनपा, नागपूर यांना माहीती करीता सविनय सादर
3) मा. अप्पर आयुक्त, ( I,II,III ) मनपा, नागपूर यांना माहीती करीता सविनय सादर
4) मा. मुख्य अभियंता, मनपा, नागपूर यांना माहीती करीता सविनय सादर
5) मा. अधिक्षक अभियंता मनपा, नागपूर, यांना माहितीकरीता सादर
6) मा.उपायुक्त / अति. उपायुक्त 1 व 2 मनपा, नागपूर यांना माहिती करीता सादर

प्रतिलीपी,

7) लेखा अधिकारी / निगम लेखा परीक्षक, मनपा, नागपूर यांना कार्यवाही करीता
8) सर्व आहरण क्लार्क्स वित्त विभाग, मनपा, नागपूर यांना कार्यवाही करीता

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

O/C

Shri Meshram
Shri Dumne
Shri Bogle
Shri Warwatkar

(SPEED POST)

न्यायालयीन प्रकरण/तातडीचे

265/07
9/6/16

क्रमांक:-याचिका-२०१६/१२१४/प्र.क्र.३२३/म-९
महसूल व वन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २०१६.

प्रति,
आयुक्त,
सर्व महानगरपालिका. (नागपूर)

विषय :- मा.उच्च न्यायालय (क्रिमिनल अँपेलेट ज्यूरिसडिक्शन) मुंबई येथील फौजदारी रिट याचिका क्र.४८११/२०१५ जीतप्रतापसिंग विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर

Hon. MC

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा.उच्च न्यायालयातील फौजदारी रिट याचिका क्र.४८११/२०१५ जित प्रतापसिंग विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये भिवंडी-निजामपूर, नाशिक, अमरावती, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अकोला, मीरा-भाईंदर या महानगरपालिकांमध्ये जकात टोल नाक्यांच्या संदर्भात मे.कोनार्क इन्फास्ट्रक्चर लिमिटेड व संबंधित महानगरपालीका यांच्या मध्ये झालेल्या करारनाम्यात मुद्रांक शुल्क चुकविण्यात आले/ कमी आकारणी झाल्याची अनुषंगाने याचिका दाखल केली आहे.

विचाराधीन याचिकेमध्ये दिनांक २८.०४.२०१६ रोजी मा.न्यायालयाने मा.मुख्य सचिव व मा.प्रधान सचिव (महसूल) यांना याप्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत निदेश दिले आहेत.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३३ नुसार प्रत्येक लोकसेवक पदाचा प्रभारी असलेल्या प्रत्येक व्यक्तींनी कर्तव्ये पार पाडीत असताना मुद्रांक शुल्क आकारणी योग्य असलेला कोणताही दस्त त्या व्यक्तीसमोर आल्यास तो दस्त यथोचित मुद्रांकित केला नसल्याचे आढळून आल्यास तो अवरुध्द करणे बंधनकारक आहे. आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमध्ये होणा-या ज्या दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे, ते भरण्यात आल्याची खातरजमा करण्यात यावी, ही विनंती.

CAFO

आपला विश्वासू,

(डॉ. के. एच. गोविंद राज)
सचिव (मदत व पुनर्वसन)

13
16/06/16.